# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone No. 24010437 / 24020781
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : jdwaterdivision@mpcb.gov.in

MAHARASHTRA

Kalptaru Point 2nd floor,
Sion Matunga Scheme Road
No. 8, Infant of Sion Cercal,
Sion (E), Mumbai – 400 022.

"Your Service is our Duty"

No./MPCB/JD(WPC)/ENV/PH/B-240828-FTS-0023 Date: 28/08/2024

**To,**
**The Principal Secretary,**
**Environment & Climate Change Department.**
**Government of Maharashtra,**
**Room No. 217 (Annex) New Administration Building,**
**Mantralaya, Mumbai-400032.**

**Sub:** Environmental Clearance - Proceedings of Public Hearing in respect of **Proposed 33 Sand** Ghats in Gadchiroli District at Gadchiroli Taluka, Sakhra (2.10 Ha.), Bodlimal (1.80 Ha.), Gai ghat (1.05 Ha.), Dibhana Ghat (1.00 Ha.), Khursa Ghat (1.20 Ha.), Kurkheda Ghat (1.50 Ha.), at Dhanora Taluka, Dudhmala Ghat (1.10 Ha.). At Chamorshi Taluka, Jibgaon (2.05 Ha.), Dotkuli (2.15 Ha.), Wagholi (2.25 Ha.). At Armori Taluka, Thotebodi (1.20 Ha.), Paraswadi (1.11 Ha.), Deulgaon-2 (2.03 Ha.), Deulgaon-1 (2.50 Ha.), Dongarsaongi (3.00 Ha.), Kitali (1.00 Ha.). At Desaiganj Taluka, Sawangi (4.00 Ha.), Kurud (Juni Wadsa) (1.00 Ha.), Kondhala (Mendha Ghat) (4.18 Ha.), Kondhala (Sindrai Ghat) (1.36 Ha.). At Sironcha Taluka, Medaram Nala (1.00 Ha.), Chipurdubba Rai.-1 (1.00 Ha.), Chipurdubba Rai.-2 (1.00 Ha.), Nagaram-1 (2.30 Ha.), Nagaram-2 (1.50 Ha.), Maddhikuntha (2.50 Ha.), Aardamal (2.50 Ha.). At Kurkheda Taluka, Kumbhitola (1.00 Ha.), Nanhi (1.80 Ha.). At Aheri Taluka, Mahagaon Bu. (2.25 Ha.), Modumtura (1.05 Ha.), Damrancha (1.02 Ha.), Bori (1.12 Ha). **Proposed by** District Mining Office, Collector Office, Gadchiroli., Maharashtra.

**Ref:** Sub-Regional Chandrapur submitted proceeding vide dt-08.08.2024, received on 12.08.2024.

**Sir,**

The Public Hearing for **Proposed 33 Sand** Ghats in Gadchiroli District at Gadchiroli Taluka, Sakhra (2.10 Ha.), Bodlimal (1.80 Ha.), Gai ghat (1.05 Ha.), Dibhana Ghat (1.00 Ha.), Khursa Ghat (1.20 Ha.), Kurkheda Ghat (1.50 Ha.), at Dhanora Taluka, Dudhmala Ghat (1.10 Ha.). At Chamorshi Taluka, Jibgaon (2.05 Ha.), Dotkuli (2.15 Ha.), Wagholi (2.25 Ha.). At Armori Taluka, Thotebodi (1.20 Ha.), Paraswadi (1.11 Ha.), Deulgaon-2 (2.03 Ha.), Deulgaon-1 (2.50 Ha.), Dongarsaongi (3.00 Ha.), Kitali (1.00 Ha.). At Desaiganj Taluka, Sawangi (4.00 Ha.), Kurud (Juni Wadsa) (1.00 Ha.), Kondhala (Mendha Ghat) (4.18 Ha.), Kondhala (Sindrai Ghat) (1.36 Ha.). At Sironcha Taluka, Medaram Nala (1.00 Ha.), Chipurdubba Rai.-1 (1.00 Ha.), Chipurdubba Rai.-2 (1.00 Ha.), Nagaram-1 (2.30 Ha.), Nagaram-2 (1.50 Ha.), Maddhikuntha (2.50 Ha.), Aardamal (2.50 Ha.). At Kurkheda Taluka, Kumbhitola (1.00 Ha.), Nanhi (1.80 Ha.). At Aheri Taluka, Mahagaon Bu. (2.25 Ha.), Modumtura (1.05 Ha.), Damrancha (1.02 Ha.), Bori (1.12 Ha). **Proposed by** District Mining Office, Collector Office, Gadchiroli., Maharashtra.

Environmental public hearing Conducted on 19.06.2024, 11.00 A.M. At Niyojan Bhavan, Collector Office, Gadchiroli, Tal-Dist-Gadchiroli, Maharashtra. The minutes of the public hearing approved and duly signed by the Public hearing panel along with the proceedings are enclosed.

a. Minutes of public hearing duly signed by the Chairman of public hearing panel in (English & Marathi)
b. Copy of Office Order
c. Video DVD and Photograph of Public Hearing.
d. List of participants.
e. Newspaper Notices for Environmental Public Hearing in English & Marathi.

This is submitted for further necessary action please.

**Yours Sincerely,**

**(Dr. Avinash Dhakne IAS),**
**Member Secretary**

**Encl: As above**

**Copy for information & necessary action to:**

1) The Regional Officer, MPCB, Chandrapur.
2) The Sub Regional Office, MPCB, Chandrapur
3) EIC, M.P. C. Board, Mumbai - For information & display of Minutes on website.

**Copy to the applicant of the project:**

District Mining Office, Collector Office, Gadchiroli., Maharashtra.

**प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, तालुका व जिल्हा-गडचिरोली, महाराष्ट्र यांच्या गडचिरोली जिल्ह्यातील प्रस्तावित ३३ रेती घाटांची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत -**

प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, तालुका आणि जिल्हा-गडचिरोली, महाराष्ट्र यांच्या गडचिरोली जिल्ह्यातील प्रस्तावित ३३ रेती घाट, गडचिरोली तालुक्यातील साखरा (२.१० हे.), बोदलीमल (१.८० हे.), गाईघाट (१.०५ हे), दिभना घाट (१.०० हे.), खुरसा घाट (१.२० हे.), कुरखेडा घाट (१.५० हे.). धानोरा तालुक्यातील दुधमाला घाट (१.१० हे.). चामोर्शी तालुक्यातील जिबगांव (२.०५ हे.), दोटकुली (२.१५ हे.), वाघोली (२.२५ हे.). आरमोरी तालुक्यातील थोटेबोडी (१.२० हे.), परसवाडी (१.११ हे.), देऊळगांव-२ (२.०३ हे.), देऊळगांव-१ (२.५० हे.), डोंगरसावंगी (३.०० हे.), किटाळी (१.०० हे.). देसाईगंज तालुक्यातील सावंगी (४.०० हे.), कुरूड (जुनी वडसा) (१.०० हे.), कोंढाळा (मेंढा घाट) (४.१८ हे.), कोंढाळा (सिंड्रई घाट) (१.३६ हे.). सिरोंचा तालुक्यातील मेडराम नाला (१.०० हे.), चिपुरडुब्बा रै.-१ (१.०० हे.), चिपुरडुब्बा रै.-२ (१.०० हे.), नागाराम-१ (२.३० हे.), नागाराम-२ (१.५० हे.), मद्दीकुंठा (२.५० हे.), आरडमल (२.५० हे.). कुरखेडा तालुक्यातील कुंभीटोला (१.०० हे.), नान्ही (१.८० हे.) व अहेरी तालुक्यातील महागांव बु. (२.२५ हे.), मोदुमतुरा (१.०५ हे.), दमरंचा (१.०२ हे.), बोरी (१.१२ हे.) यांचे प्रस्तावावर पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १९ जून, २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, तालुका व जिल्हा गडचिरोली येथे आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रत्यक्ष (Physical) त्याचप्रमाणे ऑनलाईन आयोजित करण्यास सोमवार, दिनांक १९ जून, २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४/०९/२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१/१२/२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-१३८/२०२४ व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२४०६०५-एफटीएस-००४५ दिनांक ०५/०६/२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी- प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,चंद्रपूर - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर - **समन्वयक**

श्री. उमाशंकर भादुले, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. व्ही.एस. भाकरे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्रं. १५३३, दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक ०१ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र संकीर्ण २०१९/प्र.क.०१/तां.क. ०३/१२/२०१९ नुसार गौण खनिज (वाळू गट) बी-१ संवर्गात समाविष्ट केल्याने अशा प्रकल्पांना महाराष्ट्र शासनाची पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री. उमाशंकर भादुले, समन्वयक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, तालुका व जिल्हा-गडचिरोली, महाराष्ट्र यांचा गडचिरोली जिल्ह्यातील प्रस्तावित ३३ रेती घाटांची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज दि. २३/११/२०२३ रोजी प्राप्त झाला.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्पामुळे विस्थापीत होणाऱ्या रहिवाश्यांच्या समस्या जाणून घेणे, प्रकल्प परिसरातील

सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १५/०५/२०२४ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेल्या होत्या:-

१) पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
३) प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४) प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, पहिला माळा, उद्योग भवन, बस स्टॅन्ड समोर, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५) जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.
६) जिल्हा खनिकर्म कार्यालय, गडचिरोली.
७) जिल्हा परिषद, गडचिरोली.
८) जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली.
९) गडचिरोली जिल्ह्यातील सर्व उप-विभागीय कार्यालये, सर्व तहसिल कार्यालये, सर्व पंचायत समिती कार्यालये व संबंधित ३३ ग्रामपंचायत कार्यालये, जि. गडचिरोली.
१०) तसेच मंडळाच्या www.mpcb.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

समन्वयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले.

प्रकल्प प्रवर्तकांच्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) बाबत माहिती देताना सांगितले की सदरहू ३३ रेती घाट उत्खननासाठी तेथील संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाने ना हरकत प्रमाणपत्र अदा केलेले असून उत्खनन हे राज्य पर्यावरण समितीने ठरवून दिलेल्या कालावधीपर्यंतच केले जाईल. त्याचप्रमाणे मान्सून कालावधीत म्हणजे जून ते सप्टेंबर या कालावधीत उत्खनन करण्यात येणार नाही. सदरहू प्रकल्पाचा खाणकाम आराखडा हा केंद्र शासनाच्या भूविज्ञान व खनिकर्म संचानालय, नागपूर यांनी मंजूर केलेला आहे.

सादरीकरणानंतर समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रश्नकर्त्याने आपले संपूर्ण नांव व पता सांगण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित वाळू उत्खनन प्रकल्पाबाबत सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

सदस्य यांनी शासकीय अधिकारी उपस्थित असल्यास त्यांनीही प्रश्न विचारण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांना त्यांचे काही सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांनी प्रकल्पास एकत्रित पाठिंबा दिला.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जाहिर केले की जरी उपस्थितांनी कोणातीही सूचना, आक्षेप नोंदविला नसला तरी जरी कोणाला सूचना, आक्षेप नोंदविण्याचा असला तर त्यांनी आज दिनांक १९ जून, २०२४ रोजी दुपारी ०३:०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे आक्षेप, सूचना नोंदवाव्यात. सुचित वेळेपर्यंत एकही आक्षेप, सूचना नोंदविण्यात आलेला नाही.

सदस्य यांनी सांगितले की सदरहू बैठकीचे इतिवृत पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

समन्वयक यांनी माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ०१ आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(उमाशंकर भादुले)**
समन्वयक, पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

**(व्ही.एस.भाकरे)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा अतिरिक्त
जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली